महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

## -: आदेश :-

क्र पोमसं/२/१०२०/निनिसु-२०२२५-२६/मोटार परिवहन/७६/२०२५ — दिनांक :- ३०/१२/२०२५

**संदर्भ** :- शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे-०३२५/प्र. क्र. ९०/पोल-१ अ, दिनांक ३०/१२/२०२५ (प्रत सलग्न)

**विषय** :- पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन पदावर पदोन्नतीने पदस्थापना..

* * * * *

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र पोलीस निरीक्षकांच्या सन २०२५-२६ च्या निवडसूचीवरील ०२ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीवरील पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

I. उपरोक्त शासन आदेशांत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी.

II. पदोन्नती प्राप्त पोलीस निरीक्षकांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटक प्रमुखांनी अशा पोलीस निरीक्षकास त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे.

III. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकिनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

१) शिक्षा प्रस्तावित / चालू झाली असल्यास

२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

IV. ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही मा.न्यायालयाचे, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा मा.न्यायालयीन

आदेशाची अवमान्यता होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी. अशी प्रकरणे उद्भवल्यास त्यांचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

V. निवडणूकीची आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

VI. वरील बाबी लक्षात घेऊन घटक प्रमुखांनी पदोन्नत पोलीस निरीक्षकांना त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.

**पोलीस महासंचालकांनी सर्व पदोन्नत अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०१, पुणे

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२
**(लक्षवेध :- डॉ.सुग्रिव धपाटे**, सह सचिव, गृह विभाग)

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

प्रत :-

संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ३अ, ९, ११, १४अ, ३६, ४०
संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

नियमित निवडसूची २०२५-२६:
"पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन" या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन आदेश क्र.रापोसे-०३२५/प्र.क्र.९०/पोल-१अ.**

दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दिनांक : ३० डिसेंबर २०२५.

**संदर्भ** : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२/नि.सू-२/५-२६/ मोटार परिवहन/७६/२०२५ दि.०५.१२.२०२५

४) शासन पत्र, गृह विभाग, क्र.रापोसे-०३२५/प्र.क्र.९०/पोल-१अ, दिनांक १९.१२.२०२५

**शासन आदेश**

"पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन" या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरीता तयार करण्यात आलेल्या "पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन" या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या "नियमित निवडसुची २०२५-२६" यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद पोलीस अधिकाऱ्यांना "पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, मोटार परिवहन" या संवर्गातील पदावर तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत असून त्यांची स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. (१) | अधिकाऱ्याचे नाव (२) | पदोन्नतीने पदस्थापना (३) |
|---|---|---|
| १. | श्री. स्नहेलराज माणिकराव पाटील | पोलीस उप अधीक्षक, मोटार परिवहन भांडार, खरेदी शाखा, पुणे. |
| २. | श्री. सुरजितसिंह रतनसिंह रजपूत | पोलीस उप अधीक्षक, पोलीस मध्यवर्ती मोटार परिवहन, कर्मशाळा, नागपूर. |

अटीः-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

४) उक्त निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता घेण्याच्या अधीन तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने *[ई- ऑफीस टिप्पणी क्र.- १३/ का.-१२ (सेवा-३), दिनांक १६/१२/२०२५]* आणि पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांच्या शिफारशीचा यथायोग्य विचार करुन, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न मध्ये निर्दिष्ट सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१२३०१८०९३२७७२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2025.12.30 18:12:41 +05'30'

**( डॉ. सुग्रिव धपाटे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३) संबंधित पोलीस अधिकारी (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).
४) निवड नस्ती, पोल-१अ.

प्रत-

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

४) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.